दि.२९/११/२०१८

# संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

## तदर्थ पदोन्नतीसाठी संमती पत्रे घेण्याच्या कार्यक्रमाचे वेळापत्रक.

## (मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद करीता)

## सुचनापत्र

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्यासाठी शासन पत्र क्र.पदभ-२०१५/प्र.क्र.२२६/वैसवा-२, दि.२८.८.२०१८ अन्वये संचालक,संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना सहा महिन्यांकरीता (१८० दिवस) इतक्या कालावधीकरीता सहयोगी प्राध्यापक पदावरुन, प्राध्यापक या पदावर व सहाय्यक प्राध्यापकांना सहयोगी प्राध्यापक या पदावर (चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन विषयातील पात्र अध्यापकांना) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात १८० दिवसांकरीता तदर्थ पदोन्नती देण्याकरीता मुदतवाढीचे अधिकार प्रदान करण्यांत आलेले आहेत.

खालील नमूद शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद येथील अचिकित्सालयीन व चिकित्सालयीन विषयातील रिक्त असलेल्या पदांसाठी दि.१.१.२०१७ व १.१.२०१८ रोजीच्या राज्यस्तरीय ज्येष्ठता यादीतील त्या-त्या विषयातील ज्येष्ठतेनुसार दिलेल्या क्रमांकाप्रमाणे बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांनी पदोन्नतीस पात्र असल्यास नमूद दिनांकास व वेळेत संचालनालयात आवश्यक त्या कागदपत्रांसह (शोधनिबंध व इतर शैक्षणिक प्रमाणपत्रे) उपस्थित रहावयाचे आहे.

| अ.क्र. | दिनांक | वेळ | भरावयाचे पद | विषय | निम्न संवर्गातील १.१.२०१८ रोजीची ज्येष्ठता सुची | रिक्त पदांची संख्या | पद रिक्त असलेली संस्था | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सोमवार दि.०३.१२.२०१८ | दुपारी ०२:०० ते कामकाज संपेपर्यंत | प्राध्यापक | शरीररचनाशास्त्र | दि. ०१.०१.२०१८ रोजीच्या ज्येष्ठता सूची नुसार पात्र उमेदवार | १ | नागपूर - १ | |
| | | | | शरीरक्रियाशास्त्र | | ३ | नागपूर - २<br>औरंगाबाद - १ | |
| | | | | जीवरसायनशास्त्र | | २ | मुंबई - १<br>नागपूर - १ | |
| | | | | औषधशास्त्र | | ५ | मुंबई - २<br>पुणे - २<br>औरंगाबाद - १ | |
| | | | | विकृतीशास्त्र | | १ | पुणे - १ | |
| | | | | सूक्ष्मजीवशास्त्र | | २ | मुंबई - १<br>पुणे - १ | |
| | | | | रो.प्र.व सा.औ.वै.शास्त्र | | १ | नागपूर - १ | |
| | | | | न्यायवैद्यकशास्त्र | | २ | मुंबई - १<br>नागपूर - १ | |
| २ | | | सहयोगी प्राध्यापक | शरीरक्रियाशास्त्र | दि. ०१.०१.२०१८ रोजीच्या ज्येष्ठता सूची नुसार पात्र उमेदवार | २ | पुणे - १<br>औरंगाबाद - १ | |
| | | | | जीवरसायनशास्त्र | | २ | मुंबई - १<br>औरंगाबाद - १ | |
| | | | | औषधशास्त्र | | २ | मुंबई - १<br>औरंगाबाद - १ | |
| | | | | विकृतीशास्त्र | | ३ | मुंबई - १<br>नागपूर - १<br>औरंगाबाद - १ | |
| | | | | सूक्ष्मजीवशास्त्र | | २ | पुणे - १<br>औरंगाबाद - १ | |
| | | | | रो.प्र.व सा.औ.वै.शास्त्र | | २ | मुंबई - १<br>पुणे - १ | |
| | | | | न्यायवैद्यकशास्त्र | | १ | औरंगाबाद - १ | |

..२..

(पात्र उमेदवार : दि.१.१.२०१८ च्या ज्येष्ठता यादीत नाव असलेले व सेवाप्रवेश नियमानुसार प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक या पदावर पदोन्नतीसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणारे)

सूचना :-

१. वरील वेळापत्रकानुसार वेळेवर उपस्थित न राहिल्यास तदर्थ पदोन्नतीसाठी विचार करता येणार नाही. त्यांच्याऐवजी ज्येष्ठता सूचीतील पुढील पात्र व उपस्थित असलेल्या कनिष्ठ उमेदवारास तदर्थ पदोन्नती देण्यांत येईल.

२. ज्येष्ठतेनुसार बोलाविण्यांत आलेल्या उमेदवारांपैकी जो उमेदवार अपात्र आढळून आल्यास त्यांचा तदर्थ पदोन्नतीसाठी विचार केला जाणार नाही.

३. तात्पुरत्या पदोन्नतीसाठी उपरोक्त नमूद केलेल्या संख्येने बोलविले असले तरी, रिक्त पदे भरल्यानंतर उर्वरित बोलविण्यात आलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

४. ज्येष्ठता यादीतील ज्या उमेदवारांनी एम.डी./एम.एस./पी.एचडी. किंवा डी.एन.बी. ही शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेली आहे, अशाच उमेदवारांनी उपस्थित रहावे.

५. संस्थानिहाय रिक्त पदांचा पदनिहाय तक्ता वर दिलेला आहे. सदर तक्त्यातील नमूद ठिकाणाच्या तदर्थ दिलेल्या रिक्त जागा या भरण्यात येतील. इतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त जागा भरण्यात येणार नाहीत. नमूद केलेल्या रिक्त पदांची संख्या कमी-अधिक होऊ शकते.

६. वरील वेळापत्रकानुसार निवड झालेल्या उमेदवारांना/अध्यापकांना नियुक्ती आदेश दिल्यानंतर सहा दिवसांमध्ये निवड झालेल्या संस्थेत रुजू व्हावे लागेल. त्याचबरोबर भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार आवश्यक ते हमीपत्र अधिष्ठातांमार्फत सादर करणे अनिवार्य राहील.

७. सदर निवड प्रक्रिये दरम्यान सहयोगी प्राध्यापकास तदर्थ प्राध्यापक म्हणुन पदोन्नती मिळाल्यास त्यांची रिक्त मुळ सहयोगी प्राध्यापकाचे रिक्त होणारे पद या फेरी दरम्यान भरण्यांत येणार नाही.

८. या फेरी दरम्यान लेखी संमती दिलेला उमेदवार रुजू न झाल्यास त्याचा पुढील एक वर्षाकरीता तदर्थ पदोन्नतीसाठी विचार केला जाणार नाही.

९. या फेरी दरम्यान पदोन्नती झाल्यानंतर रिक्त होणारे मुळचे पदावर पुन्हा तदर्थ स्वरुपात पात्र उमेदवाराची तदर्थ पदोन्नतीने नेमणुक करण्यांत येईल, व ते पद रिक्त राहणार नाही त्याची प्रक्रिया नंतर स्वतंत्रपणे करण्यांत येईल.

१०. शासन स्तरावरुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अथवा निवड मंडळामार्फत अथवा सेवा नियमिततेने अथवा बदलीने नियमित स्वरुपात निवड झालेला उमेदवार संस्थेमध्ये रुजू झाल्यानंतर सदरील तदर्थ पदोन्नती आपोआप संपुष्टात येईल त्याकरीता वेगळे आदेश काढण्यात येणार नाहीत. पदावनत झाल्यानंतर सदर उमेदवाराचे मुळचे पद राज्यात ज्या ठिकाणी रिक्त असेल, त्या ठिकाणी त्यांची पदस्थापना करण्यांत येईल.

११. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार अतिरिक्त पदे असल्यास तदर्थ पदोन्नती देण्याची शिफारस करण्यांत येणार नाही.

..३..

१२. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार सुधारीत अध्यादेशानुसार संशोधन लेखाच्या प्रती सोबत आणणे अनिवार्य आहे.

१३. संस्थेमध्ये सन २०१६-१७ मधील भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निरिक्षणाच्या दरम्यान ज्या तदर्थ पदोन्नती दिलेल्या अध्यापकांना संशोधन लेख भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार नसल्यामुळे स्विकृत केले नव्हते त्यांनी मुलाखतीस येताना संशोधन लेख केलेले असल्यास सोबत आणावे. ज्या अध्यापकांनी अद्यापही संशोधन लेख केलेले नाहीत, त्यांचा यापुढे तदर्थ पदोन्नतीसाठी विचार करण्यांत येणार नाही.

१४. अध्यापकांनी मुलाखतीस येताना स्वखर्चाने उपस्थित रहावे.

संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.